अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १६/०१/२०२५

**–: प्रेसनोट :–**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०३/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) सुरेश पाटील, प्रबंधक,<br>२) विशाल चव्हाण, लिपीक,<br>३) अमित महांगडे, लिपीक, महाराष्ट्र पॅरामेडिकल कौंसिल, कामा हॉस्पिटल, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ४०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ४०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी म्हणून ग्रामीण रूग्णालय, आष्टा, सांगली येथे कार्यरत आहेत. तक्रारदार यांच्या नियुक्तीनंतर त्यांना महाराष्ट्र पॅरामेडिकल कौंसिलची नोंदणी करणे व प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक असते. त्यानुसार तक्रारदार यांनी महाराष्ट्र पॅरामेडिकल कौंसिल, मुंबई याठिकाणी अर्ज सादर केला होता. दिनांक १३/०१/२०२५ रोजी तक्रारदार हे सदरहू प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता महाराष्ट्र पॅरामेडिकल कौंसिल, मुंबई या कार्यालयात गेले असता, तेथील लोकसेवक श्री. सुरेश पाटील, प्रबंधक यांनी सदरहू प्रमाणपत्र देण्याकरीता तक्रारदार यांच्या रू. ४०,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १५/०१/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १५/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान उपरोक्त नमूद लोकसेवक क्र. २ यांनी तक्रारदार यांचेकडे प्रमाणपत्र देण्याकरीता रू. ४०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे दिनांक १६/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. ३ यांनी लोकसेवक क्र. २ यांचे सांगणेवरून तक्रारदार यांचेकडून रू. ४०,०००/- लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर लोकसेवक क्र. २ यांनी लोकसेवक क्र. १ यांना संपर्क करून तक्रारदार यांच्याकडून पैसे स्विकारलेबाबत सांगितले असता, लोकसेवक क्र. १ यांनी सदरबाबत अनुमोदन दिले. त्यानुसार लोकसेवक क्र. १ ते ३ यांना ताब्यात घेण्यात आले. म्हणून उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्रीमती सुप्रिया गावडे, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. संतोष गुर्जर, पोलीस निरीक्षक

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net